# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. २०/१२/२०१९

आज शुक्रवार दि. २०/१२/२०१९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. १२/१२/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ५) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ७) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ८) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १२) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १३) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १४) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १५) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १६) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १७) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १९) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २०) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २१) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २२) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २३) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २४) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २५) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २६) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २७) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २८) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २९) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३०) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३२) | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३४) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३६) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३८) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३९) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४०) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४१) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४२) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४३) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४४) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५०) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५३) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५४) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५५) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५७) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५८) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५९) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६०) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६१) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६५) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६६) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६९) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७०) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७७) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ७८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७९) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ८०) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| २) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ३) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| ४) | जैन गीता भरत | सदस्या |
| ५) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ६) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ७) | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | सदस्या |
| ८) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ९) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १०) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ११) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १३) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| १४) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |

रजेचा अर्ज -

| | | |
|---|---|---|
| १) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |

**मा. महापौर :-**

सचिव महोदय सभेचे कामकाज सुरु करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. २०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका , स्व. इंदिरा गांधी भवन , मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे . आजच्या सभेच्या विषयपत्रिकेवरील कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी प्रशासनाकडून 3 विषय 2 के खाली आलेले आहेत. त्याच्यातला एक विषय आहे. 1. मिरा भाईंदर महानगरपालिकेची जागा शासकीय कार्यालयासाठी भाड्याने देणे . 2. मिरा भाईंदर महानगरपालिकेची जागा शासकीय कार्यालयासाठी भाड्या ने देणे. 3. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी पुतळे बसविण्याचा जागा आरक्षणात दर्शविण्यासाठी विकास योजनेत फेरबदल करणेबाबत. हे तिन्ही विषय 2 के खाली आहेत. सभागृहाची याला मान्यता आहे काय?

**धृवकिशोर पाटील :-**

आहे.

**नगरसचिव :-**

ठिक आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम पुतळ्यांचा जो विषय आहे. ते कुठचे पुतळे आहेत ते जरा आम्हाला सांगा.

**नगरसचिव :-**

गोषवाऱ्यात दिलेले आहे.

**निलम ढवण :-**

गोषवाऱ्यात नाहीत.

**नगरसचिव :-**

गोषवारा येत आहे मॅडम.

**निलम ढवण :-**

तत्पुर्वी तुम्ही मान्यता देण्यापूर्वी मला पण कळू देत पुतळे कुठचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

क चे दोन विषय तुम्ही आम्हाला त्याचा गोषवारा दिला. त्याला मंजुरी देतो. बाकीचे पुतळे कुठले त्याचा गोषवारा आधी द्या नंतर मंजुरी घ्या.

**नगरसचिव :-**

मी नाव वाचुन दाखवतो. विषय मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी पुतळे बसविण्याचा जागा आरक्षणात दर्शविण्यासाठी विकास योजनेत फेरबदल करणेबाबत . 1. मिरारोड पूर्व जॉगर्स पार्क ह्या ठिकाणी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा 2. भाईंदर पूर्व जेसलपार्क चौपाटी भारतरत्न अब्दुल कलाम यांचा अर्धाकृती पुतळा 3. भाईंदर पूर्व रेल्वे फाटक महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा . 4. मिरारोड स्टेशन जिजामाता यांचा अर्धाकृती पुतळा . 5. भाईंदर पश्चिम मॅक्सेस मॉल चौक लोकमान्य टिळक यांचा अर्धाकृती पुतळा . 6. भाईंदर पूर्व नवघर मैदान, सावित्रिबाई फुले यांचा अर्धाकृती पुतळा . 7. काशिगाव चौक माता रमाबाई आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा. 8. जनता नगर चौक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा. 9. भाईंदर पूर्व गोल्डन नेस्ट चौ क विर सावरकर यांचा अर्धाकृती पुतळा. दोन्ही विषयाला मान्यता आहे का?

**जुबेर इनामदार :-**

मान्यता आहे. विषय प्रशासनातर्फे आलेले विषय प्रशासकीय कामका ज आहे. आम्ही त्याला मान्यता देत आहेत. मात्र ह्यावर चर्चा करायची असेल.

**नगरसचिव :-**

विषय येईल तेव्हा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य इनामदार साहेब बोलल्याप्रमाणे तत्वत : हा विषय कामकाजाला घेण्याबद्दलची सर्वांची मान्यता असावी आणि नंतर ज्यावेळेस तो विषय कामकाजात येईल त्याच्यावर सविस्तर चर्चा करुन आपण एकमताने निर्णय घेऊ. जे महासभेला अपेक्षित आहे.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय ही चर्चा चालू आहे. ही सभा चालेल नाही चालेल पुढे.

**मा. आयुक्त :-**

जेव्हा केव्हा सभा चालेल त्या क्रमामध्ये हे तिन्ही विषय सगळ्यात शेवटी येतील.

**जुबेर इनामदार :-**

माझे फक्त तुमच्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, पुढच्या 4-8 दिवसानंतर कदाचित ही सभा परत लागेल . सभा संपेल कामकाज पूर्ण होईल . पोलिस स्टेशन आयुक्तालयाचा तो विषय तुमच्याकडे आलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ते आज दिले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे महापालिकेमध्ये त्याचे आरक्षण आहे . 182 आरक्षण क्रमांक हा पोलिस ठाण्यासाठी आरक्षित आहे . ती जागा ताब्यात घेण्यात आलेली नाही . कदाचित तो विषय तुमच्या लक्षात असेल.

**मा. आयुक्त :-**

आम्ही राज्य शासनाकडून ऑल रेडी नोटिफिकेशन झालेले आहे . त्या जागा सुध्दा आरक्षित आहेत. पण एखादा जर शासनाचा निर्णय ता त्काळ लागू करायची परिस्थिती आली . त्या कॅम्पस डेव्हलपमेंटला 2-3 वर्ष जाणार आहेत . एका दिवसात त्या वास्तु तयार होणार नाहीत . त्यासाठी महापालिका म्हणून आपले उत्तरदायित्व आहे की त्यांना आपल्याला मदत करणे.

**जुबेर इनामदार :-**

20 वर्ष त्यांनी ती जागा ताब्यात घेतली नाही . ही तुम्ही जागा दिल्यानंतर ती आपल्याला परत मिळेल की नाही याची शाश्वती नाही.

**मा. आयुक्त :-**

इनामदारजी त्या विषयात आपण चर्चा करुन निर्णय घेऊ.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब , महापौर मॅडम मी एक विषय दिलेला होता . कर्मचाऱ्यांचा 7 वा वेतन आयोगाचा तर तो विषय तुम्ही आता घेतला नाही तर तो विषय पुढच्या सभेला घ्यावा विनंती आहे . म्हणून 7 वा वेतन आयोगाचा.

**नगरसचिव :-**

2 के खाली तिन्ही विषयांना सभागृहाची मान्यता आहे . त्यामुळे हे वि षय आपण विषयपत्रिकेवरील सर्व विषय संपल्यानंतर शेवटी घेण्यात येतील.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे . महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी श्री . उध्दवजी बाळासाहेब ठाकरे तसेच विरोधी पक्षनेता पदी मा . श्री. देवेंद्र फडणवीस यांची निव ड झालेली असून मिरा भाईंदर शहराच्या तमाम जनतेच्यावतीने तसेच या सभागृहामार्फत त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

त्याचप्रमाणे 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातून मा. सौ. गीता भरत जैन व 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातून मा . श्री. प्रताप सरनाईक हे निव डून आल्याबद्दल मिरा भाईंदर शहराच्या नागरीकांच्यावतीने तसेच या सभागृहामार्फत त्यांचे मन :पूर्वक अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देवून भविष्यामध्ये मिरा भाईंदर शहराच्या विकासाकरीता त्यांचे अमुल्य सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तसेच नुकतेच परिवहन समिती सभापती पदी श्री . मंगेश पाटील यांची निवड झालेली असून त्यांचे देखील हार्दिक अभिनंदन करीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदस्या मा . सौ. गीता भरत जैन तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापती म्हणून निवड केलेले श्री . मंगेश पाटील यांचा येणाऱ्या मा. महासभेत त्यांचा सत्कार करण्यात यावा अशी आपणांस विनंती करतो.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. 61 :-**

**महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी श्री. उध्दवजी बाळासाहेब ठाकरे तसेच विरोधी पक्षनेता पदी मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांची निवड झालेली असून मिरा भाईंदर शहराच्या तमाम जनतेच्यावतीने तसेच या सभागृहामार्फत त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.**

**त्याचप्रमाणे 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातून मा. सौ. गीता भरत जैन व 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातून मा . श्री. प्रताप सरनाईक हे निवडून आल्याबद्दल मिरा भाईंदर शहराच्या नागरीकांच्यावतीने तसेच या सभागृहामार्फत त्यांचे मन :पूर्वक अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देवून भविष्यामध्ये मिरा भाईंदर शहराच्या विकासाकरीता त्यांचे अमुल्य सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.**

**तसेच नुकतेच परिवहन समिती सभापती पदी श्री . मंगेश पाटील यांची निवड झालेली असून त्यांचे देखील हार्दिक अभिनंदन करीत आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदस्या मा . सौ. गीता भरत जैन तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापती म्हणू न निवड केलेले श्री . मंगेश पाटील यांचा येणाऱ्या मा. महासभेत त्यांचा सत्कार करण्यात यावा.**

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

**महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणूकीत मा . शिवसेनापक्षप्रमुख श्री. उध्दवजी बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्वाखाली शिवसेना पक्षास घवघवीत यश प्राप्त झाले . राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा सन्मा. शरदचंद्रजी पवार तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सन्मा . श्रीम. सोनिया गांधी व महाराष्ट्र राज्यातील शिवसेना , राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष , भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे सर्व नेते यांच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्यामध्ये शिवसेना , राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस महाआघाडीची सत्ता स्थापन झाली असून, मुख्यमंत्री पदी मा. शिवसेनापक्षप्रमुख श्री. उध्दवजी ठाकरे व मंत्रीपदी मा. श्री. एकनाथजी शिंदे, मा. श्री. सुभाषजी देसाई, मा. श्री. छगनजी भुजबळ, मा. श्री. जयंतजी पाटील, मा. श्री. बाळासाहेब थोरात, मा. नितीनजी राऊत यांची नेमणूक झालेली आहे . या यशाबद्दल शिवसेना प क्षप्रमुख तथा मुख्यमंत्री मा . श्री. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे , मा. शरदचंद्रजी पवार, श्रीम. सोनियाजी गांधी, मा. खासदार श्री. राजनजी विचारे, मा. श्री. एकनाथजी शिंदे, मा. श्री. संजयजी राऊत, मा. श्री. सुभाषजी देसाई, मा. श्री. छगनजी भुजबळ, मा. श्री. जयंतजी पाटील, मा. श्री. बाळासाहेब थोरात, मा. नितीनजी राऊत मा. श्री. मुझफ्फरजी हुसेन तसेच शिवसेनेचे खासदार श्री. राजनजी विचारे साहेब व या शहराचे आमदार श्री . प्रतापजी सरनाईक या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.**

**146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघामधून सलग तीन वेळा मा. श्री. प्रतापजी सरनाईक हे शिवसेना पक्षाच्या वतीने 84008 मताधिक्याने आमदारपदी निवडून आलेबद्दल ही सभा अभिनंदन करीत आहे. तसेच 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार श्रीम . गिताजी भरत जैन या आमदारपदी निवडून आल्याबद्दल ही सभा अभिनंदन करीत आहे. असा मी ठराव मांडत आहे.**

**प्रविण पाटील :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**अभिनंदन ठराव क्र. 62 :-**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणूकीत मा . शिवसेनापक्षप्रमुख श्री. उध्दवजी बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्वाखाली शिवसेना पक्षास घवघवीत यश प्राप्त झाले . राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा सन्मा. शरदचंद्रजी पवार तसेच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सन्मा . श्रीम. सोनिया गांधी व महाराष्ट्र राज्यातील शिवसेना , राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष , भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे सर्व नेते यांच्या सहकार्याने महाराष्ट्र रा ज्यामध्ये शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस महाआघाडीची सत्ता स्थापन झाली असून, मुख्यमंत्री पदी मा. शिवसेनापक्षप्रमुख श्री. उध्दवजी ठाकरे व मंत्रीपदी मा. श्री. एकनाथजी शिंदे, मा. श्री. सुभाषजी देसाई, मा. श्री. छगनजी भुजबळ, मा. श्री. जयंतजी पाटील, मा. श्री. बाळासाहेब थोरात, मा. नितीनजी राऊत यांची नेमणूक झालेली आहे . या यशाबद्दल शिवसेना पक्षप्रमुख तथा मुख्यमंत्री मा . श्री. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे , मा. शरदचंद्रजी पवार, श्रीम. सोनियाजी गांधी, मा. खासदार श्री. राजनजी विचारे, मा. श्री. एकनाथजी शिंदे, मा. श्री. संजयजी राऊत, मा. श्री. सुभाषजी देसाई, मा. श्री. छगनजी भुजबळ, मा. श्री. जयंतजी पाटील, मा. श्री. बाळासाहेब थोरात, मा. नितीनजी राऊत मा. श्री. मुझफ्फरजी हुसेन तसेच शिवसेनेचे खासदार श्री. राजनजी विचारे साहेब व या शहराचे आमदार श्री . प्रतापजी सरनाईक या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघामधून सलग तीन वेळा मा . श्री. प्रतापजी सरनाईक हे शिवसेना पक्षाच्या वतीने 84008 मताधिक्याने आमदारपदी निवडून आलेबद्दल ही सभा अभिनंदन करीत आहे. तसेच 145 मिरा भाईंदर वि धानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार श्रीम . गिताजी भरत जैन या आमदारपदी निवडून आल्याबद्दल ही सभा अभिनंदन करीत आहे . असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर        अनुमोदन :- श्री. प्रविण पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**जुबेर इनामदार :-**

महाराष्ट्र शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस या तीन पक्षाच्या सहकार्याने महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले . छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुर्वगामी महाराष्ट्रात एक वेगळे समिकरण करीत या राज्याला नवीन दिशा देण्याचे काम हे नविन सरकार करेल. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनिया गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार साहेब, शिवसेना पक्षप्रमुख, उद्ध्वजी ठाकरे, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते, खासदार अहमद पटेल, मल्लिकार्जुन खरगे, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थोरात , कार्यअध्यक्ष श्री. मुझफ्फर हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली कमीन समान कार्यक्रम ठरवून एक स्थिर सरकारची स्थापन केलेली आहे. महाविकास आघाडीचे सरकार शहरी व ग्रामीण भागाला समान न्याय , महिलांना संरक्षण देण्यासाठी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष कटीबध्द आहे . महाराष्ट्राला विकासाकडे घेवून जाण्यासाठी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार राज्यात विराजमान झाल्याबद्दल महविकास आघाडी सरकारचे अभिनंदन तसेच 145 मतदार संघामधून निवडून आलेल्या अपक्ष उमेदवार सौ . गिता भरत जैन व 146 मधून भरघोस मतांनी तिसऱ्यांदा निवडून आलेल्या शिवसेनेचे प्रतापजी सरनाईक साहेबांना मनपूर्वक अभिनंदन.

अनिल सावंत :-

माझे अनुमोदन आहे.

अभिनंदन ठराव क्र. 63 :-

महाराष्ट्र शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस या तीन पक्षाच्या सहकार्याने महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुर्वगामी महाराष्ट्रात एक वेगळे समिकरण करीत या राज्याला नवीन दिशा देण्याचे काम हे नविन सरकार करेल. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनिया गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदचंद्र पवार साहेब, शिवसेना पक्षप्रमुख, उद्ध्वजी ठाकरे, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते, खासदार अहमद पटेल, मल्लिकार्जुन खरगे, प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थोरात, कार्यअध्यक्ष श्री. मुझफ्फर हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली कमीन समान कार्यक्रम ठरवून एक स्थिर सरकारची स्थापन केलेली आहे. महाविकास आघाडीचे सरकार शहरी व ग्रामीण भागाला समान न्याय, महिलांना संरक्षण देण्यासाठी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष कटीबध्द आहे. महाराष्ट्राला विकासाकडे घेवून जाण्यासाठी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार राज्यात विराजमान झाल्याबद्दल महविकास आघाडी सरकारचे अभिनंदन तसेच 145 मतदार संघामधून निवडून आलेल्या अपक्ष उमे दवार सौ. गिता भरत जैन व 146 मधून भरघोस मतांनी तिसऱ्यांदा निवडून आलेल्या शिवसेनेचे प्रतापजी सरनाईक साहेबांना मनपूर्वक अभिनंदन.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार  अनुमोदन :- श्री. अनिल सावंत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनिल सावंत :-

महाराष्ट्राचे सुपुत्र नागपूरचे रहिवाशी श्री. शरद बोबडे यांची सरन्यायाधीश पदी नियुक्ती झाल्याबद्दल या सभागृहातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे.

अभिनंदन ठराव क्र. 64 :-

महाराष्ट्राचे सुपुत्र नागपूरचे रहिवाशी श्री. शरद बोबडे यांची सरन्यायाधीश पदी नियुक्ती झाल्याबद्दल या सभागृहातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

सुचक :- श्री. अनिल सावंत  अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

धृवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर मधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, राजकारणा पेक्षा समाजकारणाला नेहमीच महत्व देत आलेले स्व. कृष्णराव गोविंदराव म्हात्रे यांचे रविवार दि. 15 डिसेंबर 2019 रोजी वयाच्या 102 व्या वर्षी निधन झाले. ते भाऊ म्हणून परिचित होते. पारदर्शक व नियमानुसार कारभार, कडक शिस्तीचे पण अजातशत्रू म्हणून ओळखले जाणारे कृष्णराव हे शेवटपर्यंत खादीचे कपडे घालत असत.

कृष्णराव यांचा जन्म 6 जानेवारी 1918 साली भाईंदर गावात झाला. त्यांचे शिक्षण दादरच्या किंग जॉर्ज शाळेतून झाले . मुंबईच्या मोरारजी मिल मध्ये ते नोकरीला होते . स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीत ते सुरुवातीपासूनच स्वातंत्र चळवळीत हिरीरीने भाग घेतला. भाईंदर ग्रामपंचायतीचे ते 1962 पासून 1971 दरम्यान सरपंच राहिले. तर 1971 ते 1975 दरम्यान ते पंचायत समितीचे सभापती व जिल्हा परिषदेचे सदस्य होते.

भाईंदर मधील सर्वसामान्यांची मुलं शिक्षणापासू न वंचित राहू नये म्हणुन त्यांनी बंद पडलेली शाळा 1959 साली पुन्हा सुरु केली. त्यावेळी दादरच्या छबिलदास शाळेच्या नाव आणि सहकार्याने सुरु केलेली व उभारलेली शाळा पुढे भाईंदर सेकंडरी झाली . भाईंदर शेतकरी शिक्षण संस्था संचालित ही शाळा आजही सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मोठे योगदान देत आहे. या शाळेतुन शिकलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवुन आहेत . याच शाळेतील अनेक विद्यार्थी आपल्या महापालिकेतील नगरसेवक आहेत. कृष्णराव हे विविध संस्थांचे मार्गदर्शक व आधारस्तंभ होते.

मिरा भाईंदर शेतकऱ्यांसाठी कृष्णराव यांनी भाईंदर शेतकरी सोसायटी 1948 साली स्थापन केली. शेतकऱ्यांसाठी स्थापन केलेल्या या संस्थेमार्फत नंतर नागरीकांना ना नफा ना तोटा तत्वावर रेशनचे धान्य मिळावे म्हणून शिधावाटप केंद्रे सुरु केली . शेतकऱ्यांच्या जमिनी समुद्राचे खारे पाणी शिरुन नापीक होऊ नये यासाठी त्यांनी बांध बंदिस्तीसाठी शासनाच्या खार बांधारे विभागाच्या माध्यमातून बांध बंदिस्तीची कामे करुन घेतली . शहरातील शेतकऱ्यांची संघटना बांधून शेतकऱ्यांसाठी लढा दिला. शेतकऱ्यांना सोबत घेऊन इस्टेट इनव्हेस्टमेंट विरुध्द आवाज उठवला.

त्याकाळी महिलांची प्रसुती ही घरच्या घरीच होत असल्याने त्यांनी जिल्हा परिषदेमार्फत भाईंदर येथे 1967 साली प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु केले त्यानंतर त्यांच्या प्रयत्नांनी महिलांसाठी 20 खाटांचे शासकीय प्रसुतीगृह सुरु करण्यात त्यांची महत्वाची भुमिका होती . 1970 सालात भाईंदरच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाकडून दिड दशलक्ष लिटर पाणी योजना मंजूर कुली.

सरपंच पदावर असताना त्यांनी भाईंदर पश्चिम गावच्या विकासाचा नियोजन आराखडा तयार केला. कृष्णराव यांनी राजकारणापेक्षा गावाच्या हिताला व समाजकारणाला नेहमीच प्रा धान्य दिले. कायदेशीर काम करण्यावर त्यांचा भर असे . कडक शिस्तीचे असलेल्या कृष्णराव यांनी त्या काळी पारदर्शक कारभार केला . ते स्थानिक असून त्याकाळी वास्तव्यास आलेल्या गुजरात व राजस्थान मधील कुटुंबियांना देखील गावचे सरपंच , ग्राम सदस्य करुन त्यांना सन्मान दिला . कोणाच्या जात, धर्म व प्रांताच्या आधारे त्यांनी भेदभाव केला नाही.

वयाच्या 102 व्या वर्षी देखील ते चालत - फिरत असत. गेले काही दिवस त्यांना न्युमोनियाने ग्रासले होते. त्यातुनच रविवार दि. 15 डिसेंबर 2019 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना !

हसमुख गेहलोत :-

माझे अनुमोदन आहे.

दु:खवठा ठराव क्र. 65 :-

मिरा भाईंदर मधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते , राजकारणा पेक्षा समाजकारणाला नेहमीच महत्व देत आलेले स्व. कृष्णराव गोविंदराव म्हात्रे यांचे रविवार दि. 15 डिसेंबर 2019 रोजी वयाच्या 102 व्या वर्षी निधन झाले. ते भाऊ म्हणून परिचित होते. पारदर्शक व नियमानुसार कारभार, कडक शिस्तीचे पण अजातशत्रू म्हणून ओळखले जाणारे कृष्णराव हे शेवटपर्यंत खादीचे कपडे घालत असत.

कृष्णराव यांचा जन्म 6 जानेवारी 1918 साली भाईंदर गावात झाला. त्यांचे शिक्षण दादरच्या किंग जॉर्ज शाळेतून झाले . मुंबईच्या मोरारजी मिल मध्ये ते नोकरीला होते . स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीत ते सुरुवातीपासूनच स्वातंत्र चळवळीत हिरीरीने भाग घेतला. भाईंदर ग्रामपंचायतीचे ते 1962

पासून 1971 दरम्यान सरपंच राहिले. तर 1971 ते 1975 दरम्यान ते पंचायत समितीचे सभापती व जिल्हा परिषदेचे सदस्य होते.

भाईंदर मधील सर्वसामान्यांची मुलं शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणुन त्यांनी बंद पडलेली शाळा 1959 साली पुन्हा सुरु केली. त्यावेळी दादरच्या छबिलदास शाळेच्या नाव आणि सहकार्याने सुरु केलेली व उभारलेली शाळा पुढे भाईंदर सेकंडरी झाली . भाईंदर शेतकरी शिक्षण संस्था संचालित ही शाळा आजही सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मोठे योगदान देत आहे. या शाळेतुन शिकलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवुन आहेत . याच शाळेतील अनेक विद्यार्थी आपल्या महापालिकेतील नगरसेवक आहेत. कृष्णराव हे विविध संस्थांचे मार्गदर्शक व आधारस्तंभ होते.

मिरा भाईंदर शेतकऱ्यांसाठी कृष्णराव यांनी भाईंदर शेतकरी सोसायटी 1948 साली स्थापन केली. शेतकऱ्यांसाठी स्थापन केलेल्या या संस्थेमार्फत नंतर नागरीकांना ना नफा ना तोटा तत्वावर रेशनचे धान्य मिळावे म्हणून शिधावाटप केंद्रे सुरु केली . शेतकऱ्यांच्या जमिनी समुद्राचे खारे पाणी शिरुन नापीक होऊ नये यासाठी त्यांनी बांध बंदिस्तीसाठी शासनाच्या खार बांधारे विभागाच्या माध्यमातून बांध बंदिस्तीची कामे करुन घेतली . शहरातील शेतकऱ्यांची संघटना बांधून शेतकऱ्यांसाठी लढा दिला. शेतकऱ्यांना सोबत घेऊन इस्टेट इनव्हेस्टमेंट विरुध्द आवाज उठवला.

त्याकाळी महिलांची प्रसुती ही घरच्या घरीच होत असल्याने त्यांनी जिल्हा परिषदेमार्फत भाईंदर येथे 1967 साली प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु केले त्यानंतर त्यांच्या प्रयत्नांनी महिलांसाठी 20 खाटांचे शासकीय प्रसुतीगृह सुरु करण्यात त्यांची महत्वाची भुमिका होती . 1970 सालात भाईंदरच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाकडून दिड दशलक्ष लिटर पाणी योजना मंजूर कुली.

सरपंच पदावर असताना त्यांनी भाईंदर पश्चिम गावच्या विकासाचा नियोजन आराखडा तयार केला. कृष्णराव यांनी राजकारणापेक्षा गावाच्या हिताला व समाजकारणाला नेहमीच प्राधान्य दिले . कायदेशीर काम करण्यावर त्यांचा भर असे . कडक शिस्तीचे असलेल्या कृष्णराव यांनी त्या काळी पारदर्शक कारभार केला . ते स्थानिक असून त्याकाळी वास्तव्यास आलेल्या गुजरात व राजस्थान मधील कुटुंबियांना देखील गावचे सरपंच , ग्राम सदस्य करुन त्यांना सन्मान दिला . कोणाच्या जात, धर्म व प्रांताच्या आधारे त्यांनी भेदभाव केला नाही.

वयाच्या 102 व्या वर्षी देखील ते चालत - फिरत असत. गेले काही दिवस त्यांना न्युमोनियाने ग्रासले होते. त्यातुनच रविवार दि. 15 डिसेंबर 2019 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना !

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनिल सावंत :-

मिरा भाईंदरमधील कॉंग्रेस ज्येष्ठ नेते स्वातंत्र सेनानी , गांधीवादी नेते कृष्णराव गोविंदराव म्हात्रे यांचे वयाच्या 102 व्या वर्षी रविवार दि. 15/12/2019 रोजी निधन झाले. साधी राहणी आणि शेवटपर्यंत खादीचा अंगीकार करणारे ते भाऊ म्हणून परिचित होते . त्यांचा जनसंपर्क दांडगा होता . भाऊंचा जन्म 6 जानेवारी 1918 साली भाईंदर गावात झाला . त्यांचे शिक्षण दादरच्या किंग जॉर्ज शाळेत झाले. यावरुन ते शिक्षणाच्याबाबतीत किती जागरुक होते हे दिसून येते. स्वतंत्र चळवळीत ते सुरुवाती पासूनच कॉंग्रेसशी जोडले गेले आणि अखेरच्या श्वासापर्यंत कोणत्याही पदाची अपेक्षा न बाळगता एकनिष्ट राहिले. भाईंदर ग्रामपंचायतीत ते 1962 ते 1971 दरम्यान सरपंच राहिले. 1971

ते 1975 दरम्यान ते पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद सदस्य होते . शेतक-यांसाठी त्यांनी 1948 साली भाईंदर शेतकरी सोसायटीची स्थापना केली. 1959 साली भाईंदर शेतकरी शिक्षण संस्थेची स्थापना करुन दादर येथील छबिलदास शाळेच्या माध्यमातून भाईंदर येथे प हिली शाळा सुरु केली . आज याच संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या शाळेमध्ये समाजातील सर्व स्तरातील मुले उत्कृष्ठ शिक्षण घेत आहेत . स्थापनेपासून ही संस्था नावारुपाला आणण्यामध्ये भाऊंचे मोठे योगदान आहे. एवढेच नव्हेतर शहरातील विविध संस्थांचे ते मार्गदर्शक व आधारस्तंभ होते . शेतकऱ्यांसाठी स्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी विरुध्द लढयाचे नेतृत्व भाऊंनीच केले आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला . भाईंदरच्या टेंबा इस्पीतळात महिलांसाठी 20 खाटांचे आरोग्य केंद्र भाऊंमुळेच 1967 साली सुरु झाजे. शहरातील पाण्याचा प्रश्न लक्षात घेवून 1967 साली त्यांनी दिड दशलक्ष लिटर पाणी प्रशासनाकडून मंजूर करुन घेतले . भाऊंनी राजकारणाच्या माध्यमातून समाजकारणाला नेहमीच महत्व दिले . समाजाचे हित पाहूनच कायदेशीर काम करण्यावर त्यांचा भर असे . जात, धर्म, प्रांत असा भेद त्यांनी कधीच केला नाही . त्यामुळेच त्यावेळी त्यांनी इतर समाजातील येथे वास्तव्यास आलेल्या लोकांना सरपंच, ग्रामपंचायत सदस्य बनविले . राजकारणातील स्वार्थ , भ्रष्ट्राचार, संधिसाधुपणा याला त्यांनी स्पर्शही होऊ दिला नाही. वयाच्या 102 वर्षी देखील ते निरोगी होते व चालत फिरत होते.

या शहरात अनेक स्वातं त्रयसैनिक होऊन गेले आहेत . भारताला स्वातंत्रय मिळण्यामध्ये त्यांचे योगदान लक्षात घेवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून सैनिक भवनाचे निर्माण करणे हीच कृष्णारावाना (भाऊंना) खरी श्रध्दांजली ठरेल . त्यांच्या आत्म्याला चिरकाल शांती मिळावी आणि या शहरात “सैनिक भवन” निर्माण व्हावे असा मी सभागृहाच्यावतीने ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

दु:खवठा ठराव क्र. 66 :-

मिरा भाईंदरमधील काँग्रेस ज्येष्ठ नेते स्वातंत्र सेनानी , गांधीवादी नेते कृष्णराव गोविंदराव म्हात्रे यांचे वयाच्या 102 व्या वर्षी रविवार दि. 15/12/2019 रोजी निधन झाले. साधी राहणी आणि शेवटपर्यंत खादीचा अंगीकार करणारे ते भाऊ म्हणून परिचित होते . त्यांचा जनसंपर्क दांडगा होता . भाऊंचा जन्म 6 जानेवारी 1918 साली भाईंदर गावात झाला . त्यांचे शिक्षण दादरच्या किंग जॉर्ज शाळेत झाले. यावरुन ते शिक्ष णाच्याबाबतीत किती जागरुक होते हे दिसून येते . स्वतंत्र चळवळीत ते सुरुवाती पासूनच काँग्रेसशी जोडले गेले आणि अखेरच्या श्वासापर्यंत कोणत्याही पदाची अपेक्षा न बाळगता एकनिष्ट राहिले . भाईंदर ग्रामपंचायतीत ते 1962 ते 1971 दरम्यान सरपंच राहिले . 1971 ते 1975 दरम्यान ते पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद सदस्य होते . शेतक-यांसाठी त्यांनी 1948 साली भाईंदर शेतकरी सोसायटीची स्थापना केली. 1959 साली भाईंदर शेतकरी शिक्षण संस्थेची स्थापना करुन दादर येथील छबिलदास शाळेच्या माध्यमातून भाईंदर येथे पहिली शाळा सुरु केली . आज याच संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या शाळेमध्ये समाजातील सर्व स्तरातील मुले उत्कृष्ठ शिक्षण घेत आहेत . स्थापनेपासून ही संस्था नावारुपाला आणण्यामध्ये भाऊंचे मोठे योगदान आहे. एवढेच नव्हेतर शहरातील विविध संस्थांचे ते मार्गदर्शक व आधारस्तंभ होते . शेतकऱ्यांसाठी स्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी विरुध्द लढयाचे नेतृत्व भाऊंनीच केले आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला . भाईंदरच्या टेंबा इस्पीतळात महिलांसाठी 20 खाटांचे आरोग्य केंद्र भाऊंमुळेच 1967 साली सुरु झाजे. शहरातील पाण्याचा प्रश्न लक्षात घेवून 1967 साली त्यांनी दिड दशलक्ष लिटर पाणी प्रशासनाकडून मंजूर करुन घेतले . भाऊंनी राजकारणाच्या माध्यमातून समाजकारणाला नेहमीच महत्व दिले . समाजाचे हित पाहूनच कायदेशीर काम करण्यावर त्यांचा भर असे . जात, धर्म, प्रांत असा भेद त्यांनी कधीच केला नाही . त्यामुळेच त्यावेळी त्यांनी इतर समाजाती ल येथे वास्तव्यास आलेल्या लोकांना

सरपंच, ग्रामपंचायत सदस्य बनविले . राजकारणातील स्वार्थ, भ्रष्ट्राचार, संधिसाधुपणा याला त्यांनी स्पर्शही होऊ दिला नाही. वयाच्या 102 वर्षी देखील ते निरोगी होते व चालत फिरत होते.

या शहरात अनेक स्वातंत्र्यसैनिक होऊन गेले आहेत . भारताला स्वातंत्र्य मिळण्यामध्ये त्यांचे योगदान लक्षात घेवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून सैनिक भवनाचे निर्माण करणे हीच कृष्णारावाना (भाऊंना) खरी श्रध्दांजली ठरेल. त्यांच्या आत्म्याला चिरकाल शांती मिळावी आणि या शहरात "सैनिक भवन" निर्माण व्हावे असा मी सभागृहाच्यावतीने ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

अनिल सावंत :-

आपल्या बावनकशी निसर्गदत्त अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करणारे आणि बुध्दीवादाची कास धरुन सामाजिक बांधिलकी जपणारे उच्च विद्याविभुषित नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांचे वृध्दापकाळाने वयाच्या 92 व्या वर्षी दि . 17/12/2019 रोजी दु:खद निधन झाले . त्यांच्या जाण्याने कसदार रंगकर्मी गमावला . राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा सहवास लाभलेले डॉ . बुध्दीनिष्ट तर्कनिष्ट असे गांधीवादीही होते . त्यांचा अभिनय जागतिक दर्जाचा होता . त्यांनी केलेल्या असंख्य भूमिकामधील अभिनयामुळे प्रेक्षक भारावून जात . डॉक्टरी सोडून रंगभूमीवर आलेले ते पहिले डॉक्टर . मराठी नाटक , सिनेमासह त्यांनी हिंदी चित्रपटात देखील असंख्य भू मिका करुन आपला ठसा उमटविला. त्यांचे लमाण हे आत्मचरीत्र प्रसिध्द आहे. ते नेहमीच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहिले. मेधा पाटकरांचे आंदोलन, अण्णा हजारेंचे आंदेलन, डॉ. दाभोलकरांचा शनी शिंगणापूरचा लढा अशा अनेक सामाजिक लढयात त्यांचे योगदान होते . मनोरंजनाबरोबरच नाटकाने प्रेक्षकांना अधिक सुसंस्कृत केले पाहिजे आणि प्रेक्षकानांही अधिक सुसंस्कृत होण्यासाठी उत्सुक असले पाहिजे असा मनोरंजना पलिकडचा कलाविचार लागूंनी अगोदर स्वत : आत्मसात केला व समाजा समोर मांडला . रंगभूमीवरचा हा 'हिमालय, नटसम्राट, सुर्य पहिलेला" विचारवंत कलाकार आपल्यातून गेला असला तरी त्यांच्या विचारांनी आपल्यावर धरलेली सामाजिक जाणिवांची सावली यापुढेही सतत प्रेरणा देत राहील.

त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि या शहरात महापालिकेच्या माध्यमातून निर्माण होत असलेल्या नाट्यगृहाला "नटसम्राट डॉ. श्रीराम लागू" यांचे नाव द्यावे असा मी सभागृहाच्या वतीने ठराव मांडत आहे.

राजीव मेहरा :-

माझे अनुमोदन आहे.

दु:खवठा ठराव क्र. 67 :-

आपल्या बावनकशी निसर्गदत्त अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करणारे आणि बुध्दीवादाची कास धरुन सामाजिक बांधिलकी जपणारे उच्च वि द्याविभुषित नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांचे वृध्दापकाळाने वयाच्या 92 व्या वर्षी दि . 17/12/2019 रोजी दु:खद निधन झाले . त्यांच्या जाण्याने कसदार रंगकर्मी गमावला . राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा सहवास लाभलेले डॉ . बुध्दीनिष्ट तर्कनिष्ट असे गांधीवादीही होते . त्यांचा अभिनय जागतिक दर्जाचा होता . त्यांनी केलेल्या असंख्य भूमिकामधील अभिनयामुळे प्रेक्षक भारावून जात . डॉक्टरी सोडून रंगभूमीवर आलेले ते पहिले डॉक्टर . मराठी नाटक , सिनेमासह त्यांनी हिंदी चित्रपटात देखील असंख्य भूमिका करुन आपला ठसा उमटविला. त्यांचे लमाण हे आत्मचरीत्र प्रसिध्द आहे. ते नेहमीच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहिले. मेधा पाटकरांचे आंदोलन, अण्णा हजारेंचे आंदेलन, डॉ. दाभोलकरांचा शनी शिंगणापूरचा लढा

अशा अनेक सामाजिक लढयात त्यांचे योगदान होते . मनोरंजनाबरोबरच नाटकाने प्रेक्षकांना अधिक सुसंस्कृत केले पाहिजे आणि प्रेक्षकानांही अधिक सुसंस्कृत होण्यासाठी उत्सुक असले पाहिजे असा मनोरंजना पलिकडचा कलाविचार लागूंनी अगोदर स्वत : आत्मसात केला व समाजा समोर मांडला . रंगभूमीवरचा हा “हिमालय, नटसम्राट, सुर्य पहिलेला” विचारवंत कलाकार आपल्यातून गेला असला तरी त्यांच्या विचारांनी आपल्यावर धरलेली सामाजिक जाणिवांची सावली यापुढेही सतत प्रेरणा देत राहील.

त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि या शहरात महापालिकेच्या माध्यमातून निर्माण होत असलेल्या नाट्यगृहाला “नटसम्राट डॉ. श्रीराम लागू” यांचे नाव द्यावे असा मी सभागृहाच्या वतीने ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदन :- श्री. राजीव मेहरा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रभात पाटील :-

आपल्या नैसर्गिक अभिनयाच्या बळावर मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे चतुरस्त्र अभिनेते, मराठी रंगभूमीचा अनभिषिक्त नटसम्राट, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रीराम लागू यांचे दि. 17 डिसेंबर 2019 रोजी वयाच्या 92 व्या वर्षी पुण्यात वृध्दापकाळाने निधन झाले.

डॉ. श्रीराम लागू यांच्या निधनाने चित्रपट आणि नाटक क्षेत्राची मोठी हानी झाली असून महाराष्ट्राच्या अशा अष्टपैलू अभिनेत्यास ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

हेतल परमार :-

माझे अनुमोदन आहे.

दु:खवठा ठराव क्र. 68 :-

आपल्या नैसर्गिक अभिनयाच्या बळावर मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे चतुरस्त्र अभिनेते, मराठी रंगभूमीचा अनभिषिक्त नटसम्राट, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रीराम लागू यांचे दि. 17 डिसेंबर 2019 रोजी वयाच्या 92 व्या वर्षी पुण्यात वृध्दापकाळाने निधन झाले.

डॉ. श्रीराम लागू यांच्या निधनाने चित्रपट आणि नाटक क्षेत्राची मोठी हानी झाली असून महाराष्ट्राच्या अशा अष्टपैलू अभिनेत्यास ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

सुचक :- श्रीम. प्रभात पाटील अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

ज्योत्सना हसनाळे :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक स्व . आसिफ गुलाम रसूल पटेल यांचे दि . 10/12/2019 रोजी निधन झाले आहे . ते काशिमिरा परिसरातून दोन वेळा नगरसेवक पदी निवडून आले होते. तसेच प्रभाग समितीचे सभापती पद देखील भुषविले होते . नगरसेवक व प्रभाग समिती सभापती पदाच्या कारकिर्दीत त्या परिसरात त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली . मिरा भाईंदर शहरातील विकास कामातही त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

काही दिवसापासून ते आजारी होते. दि. 10/12/2019 रोजी त्यांचे निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची इश्वर त्यांना शक्ती देवो ही इश्वर चरणी प्रार्थना.

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवठा ठराव क्र. 69 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक स्व . आसिफ गुलाम रसूल पटेल यांचे दि . 10/12/2019 रोजी निधन झाले आहे . ते काशिमिरा परिसरातून दोन वेळा नगरसेवक पदी निवडून आले होते. तसेच प्रभाग समितीचे सभापती पद देखील भुष विले होते. नगरसेवक व प्रभाग समिती सभापती पदाच्या कारकिर्दीत त्या परिसरात त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली . मिरा भाईंदर शहरातील विकास कामातही त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

काही दिवसापासून ते आजारी होते. दि. 10/12/2019 रोजी त्यांचे निधन झाले असून त्यांच्या निधनाबद्दल ही सभा शोक व्यक्त करुन त्यांच्या परिवारास हे दु :ख सहन करण्याची इश्वर त्यांना शक्ती देवो ही इश्वर चरणी प्रार्थना.

सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**निलम ढवण :-**

आपल्या सर्वांचे संरक्षण करीत असताना शहिद झालेले स्व . ज्योतिबा चौगुले हे कोल्हापूर गावचे सुपुत्र असून ते दि. 18/12/2019 रोजी विरोधकांशी लढत असताना शहिद झालेले आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका श्रीम . वंदना चक्रे यांचे पती श्री . रामदास चक्रे यांचेदेखील अल्पशा आजाराने निधन झालेले आहे. त्यांचादेखील मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगांवकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवठा ठराव क्र. 70 :-**

आपल्या सर्वांचे संरक्षण करीत असताना शहिद झालेले स्व . ज्योतिबा चौगुले हे कोल्हापूर गावचे सुपुत्र असून ते दि. 18/12/2019 रोजी विरोधकांशी लढत असताना शहिद झालेले आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका श्रीम . वंदना चक्रे यांचे पती श्री . रामदास चक्रे यांचेदेखील अल्पशा आजाराने निधन झालेले आहे. त्यांचादेखील मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगांवकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच सभापती आसिफ गुलाम रसूल पटेल यांचे निधन झालेल आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**अनिल सावंत :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**दु:खवठा ठराव क्र. 70अ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच सभापती आसिफ गुलाम रसूल पटेल यांचे निधन झालेल आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदन :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**धृवकिशोर पाटील :-**

**मिरा भाईंदर शहरातील जेष्ठ नेते स्व. कृष्णा गोविंदराव म्हात्रे, मिरा भाईंदर शहराचे माजी नगरसेवक स्व. आसिफ गुलाम रसूल पटेल तसेच अष्टपैलू कलाकार डॉ. श्रीराम लागु यांचे निधनाबद्दल यांना सभागृहात श्रध्दांजली वाहीली असून आजची ही मा. महाससभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**सभा तहकुबी ठराव क्र. 71 :-**

**मिरा भाईंदर शहरातील जेष्ठ नेते स्व. कृष्णा गोविंदराव म्हात्रे, मिरा भाईंदर शहराचे माजी नगरसेवक स्व. आसिफ गुलाम रसूल पटेल तसेच अष्टपैलू कलाकार डॉ. श्रीराम लागु यांचे निधनाबद्दल यांना सभागृहात श्रध्दांजली वाहीली असून आजची ही मा. महाससभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

**मृतआत्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी आपल्या जागेवर शांत उभे रहायचे आहे.**

**मा. महापौर :-**

**आजची सभा तहकुब करण्यांत येत आहे. वेळ आणि तारीख नंतर आपल्याला कळविण्यांत येईल.**

**(सभा तहकुब वेळ स. 11.51 वाजता)**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका